**आर.सी.सी क्र.१६४/२०१९** **निशाणी क्र.१५५**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२**

**मी शपथेवर कथन करतो की,**

नाव – लक्ष्मण एकनाथ धोत्रे,

वय – २८ वर्षे, कामधंदा – मजुरी

रा – बोधेगांव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

**<u>सरतपास</u>**

**<u>अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. दराडे यांचे मार्फत</u> –**

०१. दिनांक ०६/०८/२०१९ रोजी मला सहा. फौजदारी श्री. खेडकर यांनी पंचनाम्यास जाण्याकरिता बोलावले नव्हते. त्यादिवशी माझ्या समक्ष जप्ती पंचनामा केला नव्हता. मी पंचनाम्यावर सही केली होती. आता मला जप्ती पंचनाम्यावरील अनु. क्र.०१ वरील सही दाखवण्यात आली, ती सही माझी आहे. परंतु, त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सहा.सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासणीची परवाणगी मागीतली, परवानगी देण्यात आली)**

म्हणणे खरे नाही की, दि.०६/०८/२०१९ रोजी, सहा फौजदार श्री. खेडकर यांनी मला बोधेगाव दूरक्षेत्र पोलीस चौकी मध्ये पंचनाम्यास जाण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, शेवगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र.३५२/२०१९ मधील एक ट्रॅक्टर मुंगी रोड येत आहे त्यावर छापा टाकण्यासाठी जायचे आहे असे मला सांगण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व दुसरा पंच, तसेच सहा. फौजदार खेडवर व इतर पोलीस स्टाफ सदर रस्त्याने जात असतांना समोरुन एक ट्रॅक्टर येतांना दिसला. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष पोलीसांनी सदर ट्रॅक्टर चालकस थांबविण्याचा ईशारा केला व सदर ट्रॅक्टर चालकाचे नाव विचारले. हे म्हणणे खरे नाही की, सदर चालकाने त्याचे नाव सतिष दत्तात्रय केळकर असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, सदर ट्रॅक्टरचा नोंदणी क्र. एम.एच. १६ बी. एम. ३८५३ असा होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर ट्रॅक्टरला एक ट्रॉली जोडली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा ट्रॅक्टर गुन्हयातील असल्याची खात्री झाली व त्यानंतर सदर ट्रॅक्टर माझ्या समक्ष जप्त रकण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदर ट्रॅक्टर चा जप्ती पंचनामा करुन मला वाचुन दाखविला व त्यावर मी पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझ्या ओळखीचे आहेत व त्यांना वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष दिली.

**<u>आरोपी क्र.०१ ते ०५, ९, १३, १५ व १७ तर्फे विधिज्ञ श्री. गलांडे उलटतपास</u>**

नाकारला,

उर्वरित आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एल. एच. लांडे यांनी उलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकत,

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.09 13:07:27 +0530

दिनांक– ०९/०३/२०२६

(वैशाली स. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२), शेवगाव.